Shobana Vasudevan
Digitally signed by Shobana Vasudevan
Date: 2024.03.24 23:11:29 +05'30'



## 7.1.3- Waste Management initiatives at R.A. Podar College

Turning heads and making headlines: Our waste management initiatives have earned applause from both society and the media.

**Waste management**

Compost pit maintained at Lata-Kunj (in campus) for green waste recycling.



Compost/manure prepared by green waste.






Media coverage for the initiative of preparing Compost using green waste in Maharashtra Times, 20th August 2019.



पर्यावरणाची काळजी घेण्याबाबत सोशल मीडियावर खूप काही पोस्ट केलं जातं, चर्चा होते. प्रत्यक्षात त्यावर काम करणारे मात्र कमीच. पोदार कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मात्र स्वतः पुढाकार घेत कचरा व्यवस्थापनासाठी पावलं टाकली आहेत. कॉलेजमध्येच कचऱ्यापासून कंपोस्ट खताची निर्मिती केली जातेय. जाणून घेऊ त्याविषयी...

# फक्त पोस्ट नव्हे, कंपोस्ट

## पोदारचं पर्यावरणस्नेही पाऊल

मधुरा वालावलकर, गरवारे इन्स्टिट्यूट

कचऱ्याची विल्हेवाट लावणं ही मुंबईसह अनेक शहरांसाठी गंभीर समस्या झाली आहे. पर्यावरणरक्षणाच्या दृष्टिनं कचऱ्याचं योग्य प्रकारे व्यवस्थापन करणं गरजेचं झालंय. पोदार कॉलेजनं त्यासाठीच काही पावलं उचलत इतर कॉलेजांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

कचरा व्यवस्थापन करताना ओला आणि सुका कचरा यांचं वर्गीकरण महत्त्वाचं ठरतं. पालिकेकडून हे वारंवार सांगितलं जात असलं, तरी नागरिक त्याकडे गांभीर्यानं पाहत नाहीत. पोदारच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या कॅम्पसमध्येच कंपोस्ट खड्ड्याची निर्मिती केली आहे. कँटिनमधला ओला कचरा, उरलेला भाजीपाला, आवारात पडलेली झाडांची सुकी पानं यावरोबरच माटुंगा भाजी मार्केटमधला ओला कचरा या सगळ्या कचऱ्याचं व्यवस्थापन या कंपोस्ट खड्ड्यामार्फत केलं जात आहे. भाजी मार्केटमधला ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात पोदार कॉलेजच्या उपक्रमाचा मोठा हातभार लागला आहे. आठवड्यातून दोन-तीन वेळा कचरा गोळा केली जातो. यासाठी एक चमू तयार करण्यात आला असून, त्यातील सदस्यांच्या नियमित देखरेखीखाली हे काम होतं. पुरेसा कचरा गोळा झाल्यावर ३ ते ६ महिन्यांच्या काळात नैसर्गिकरित्या हा कचरा विघटीत होतो. यातून निर्माण होणारं खत हे चहा पावडरसारखं दिसतं. हे खत कॉलेज कॅम्पसमध्ये आणि इतरत्र वापरासाठी देण्यात येणार आहे.

### कागद कार्यशाळा

नेचर क्लबच्या प्रा. कपिलदेव इंदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली चमूनं काही प्रमाणात सेंद्रिय खताचं उत्पादन केलेलं आहे. याशिवाय इ-कचरा व्यवस्थापन, टेट्रा पॅक व्यवस्थापन या गोष्टीही कॉलेजमध्येच राबवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासोबतच खारफुटी जतनासाठी जनजागृती, वाया जाणाऱ्या कागदाचा पुनर्वापर करण्यासाठी हस्तनिर्मित कागद बनवण्याची कार्यशाळा असे इतर अनेक उपक्रमही राबवण्यात येत आहेत.

> आम्ही नेहमीच पर्यावरणपूरक कार्यक्रमांना पाठिंबा देत असतो. हे उपक्रम राबवताना, त्यामागचा मूळ उद्देश पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा, त्यांना निसर्गसंवर्धनाचं महत्त्व समजावं हा विचार यामागे आहे. मुलांनी स्वतःहून या सगळ्या उपक्रमांसाठी पुढाकार घेतला हे कौतुकास्पद आहे. सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थीच सांभाळत असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही हे पूरक आहे. सर्व उपक्रम शेवटपर्यंत व्यवस्थित पार पाडले जावेत यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> –डॉ. शोभना वसुदेवन, प्रिन्सिपल

**Tetra-packs collection drives:**

Empty tetra-packs collected through students



Tetra-pack bin for collection



Students segregating the tetra-packs.



**Paper bag making and distribution**

Turning headlines into handholds: Newspapers aren't just for reading; they're a solution! Transforming them into paper bags, we're making a significant impact on waste management. Every page, a step towards a plastic-free future.


Paper bags made by students



**Distribution in the market area**

Leading the change from within: Our principal takes the helm in educating and encouraging neighborhood vendors to switch to paper bags, fostering a collective effort for a plastic-free environment. Principal herself distributing the paper bags.



A student of R.A. Podar College, Abhishek Gadkari gets features in the Maharashtra Times for recycling used papers and preparing articles from paper.

**रेडिमेडच्या जमान्यात कलात्मक हँडमेड वस्तूंनाही खूप मागणी आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवात काही कॉलेजिअन्सनी कल्पकतेनं वेगवेगळ्या हस्तकलेच्या वस्तू बनवून त्याची विक्री केली आणि त्यांचा 'पॉकेटमनी' मिळवला. नवरात्रीमध्ये त्यांनी आणलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण कलेक्शन्सविषयी...**

# कलेकलेनं कमाई

### टाकाऊपासून टिकाऊ



सहावी ते दहावीपर्यंत मी शिक्षणासाठी होस्टेलमध्ये होते. त्यावेळी हँडमेड वस्तू कशा प्रकारे बनवल्या जातात हे तिथे आम्हाला शिकवण्यात आलं. त्यामध्ये हँडमेड इअररिंग्स, वारली पेंटिंग फ्रेम, शोपीस, तोरण, कार्डपेपरपासून बनवलेली फुलं अशा विविध वस्तू बनवायला मी शिकले. माझ्या लहानपणीच आई-वडिलांचं निधन झालं. त्यामुळे या कलेच्या माध्यमातून मला शिक्षणासाठी थोडीफार मदत होई.



हातात पैसे नसल्यामुळे अडचणी आल्याच. त्यातूनही 'टाकाऊपासून टिकाऊ' या संकल्पनेचा वापर करुन मी नवनवीन वस्तू बनवत राहिले आणि लोकांनाही त्या आवडल्या. कॉलेजमध्ये कोणाचा बर्थडे किंवा काही सण असला, की माझे फ्रेंड्स भेटवस्तू, ग्रीटिंग कार्ड इत्यादी वस्तू घेतात. काही वस्तू मी दुकानांमध्ये विकण्यासाठी देखील देते.- **सुनीता पायगुडे**, जीवनदीप कॉलेज

### धाग्याचे झुमके



मला कलेची खूप आवड. चित्रकला, हस्तकला आणि संगीतामध्ये मला खूप रुची आहे. त्यातच सिल्क धाग्यापासून दागिने बनवण्याचाही छंद मला लागला. माझ्या एका मैत्रिणीनं मला धाग्याचे झुमके वाढदिवसाला भेट म्हणून दिले. ते मला इतके आवडले की मी युट्यूबवर वगैरे सर्च करून इअररिंग्ज, बांगड्या, हेअर क्लिप्स, हेअर बँड बनवायला शिकले. माझ्या मित्र-मैत्रिणींनी हळूहळू इतरांना, नातेवाईकांना माझ्या या व्यवसायाबद्दल सांगायला सुरुवात केली आणि मग ऑर्डर्स येऊ लागल्या. या नवरात्रीला मी खास नऊ रंगांचे नऊ झुमके बनवले. त्याच्या खूप ऑर्डर्स मिळाल्या.



**- मानसी बोरसे**, पाटकर कॉलेज

### चांगला प्रतिसाद



चित्रकलेची आवड असल्याने मी प्राण्यांचे स्केच काढायचे. नंतर मी माणसांचेही स्केचेस काढू लागले. माझ्या भाच्याला त्याच्या वाढदिवशी मी त्याचं स्केच भेट दिलं. इथूनच माझ्या स्केचिंगच्या व्यवसायाला सुरुवात झाली. इन्स्टाग्रामवर स्वतःचं पेज सुरू केल्यानंतर मला मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, इन्स्टाग्राम फॉलोअर्स यांच्याकडून ऑर्डर्स यायला सुरुवात झाली. स्केचिंगला जोड म्हणून मी ग्रीटिंग कार्ड्स, एक्सप्लोजन बॉक्स, हँडकट पोर्ट्रेट, ओरिगामी, थ्रीडी पेंटिंग यांसारख्या गोष्टी बनवायला सुरुवात केली. अभ्यास सांभाळून मी माझा छंद जोपासते आहे. आई-बाबांकडून पाठिंबा मिळतो. पॉकेटमनीची रक्कम हातात पडते. यंदा नवरात्रीनिमित्त मी 'पॉलिमर क्ले'चे इअररिंग्ज तसंच खास तोरणं बनवली आहेत. या सगळ्या वस्तूंना चांगला प्रतिसाद मिळत आहे.



**- अंकिता धामापूरकर**, डी. जी. रुपारेल कॉलेज

### कागदापासून कलाकृती



दोन वर्षांपूर्वी मी पेपर क्विलिंगचे दागिने बनवायला सुरुवात केली. त्याबरोबरच कागदापासून कलाकृती निर्माण करण्याचा मला छंद आहे. माझी बहिण सोनालीसुद्धा मला या कामात मदत करते. फेसबुक आणि युट्यूबच्या माध्यमातून मी माझ्या या व्यवसायाचं प्रमोशन करतो. अधिक नफा मिळवण्यापेक्षा ग्राहकांना वस्तू कमी भावात मिळाव्यात, यासाठी मी प्रयत्नशील असतो.





कॉलेजमधल्या अनेक मुली माझ्याकडून पेपर रिंग्ज विकत घेतात. यातून मिळणाऱ्या पैशांतून मी माझ्या कलाकृतीत आणखी नावीन्य आणण्याचा प्रयत्न करतो.

**- अभिषेक गडकरी**, पोदार कॉलेज

संकलन - दिशा सावंत, पाटकर कॉलेज

Shobana Vasudevan

Digitally signed by Shobana Vasudevan
Date: 2024.03.24 23:11:52 +05'30'